**फौ.चौ.अर्ज क्र. ५२/२०२४**
(MHAH250005912024)
लिनता सुशिल चिकणे–२ विरुध्द
सुशिल सुदर्शन चिकणे व इतर

**अर्जदाराचे अंतरिम पोटगीचे अर्जावरील आदेश**

अर्जदार क्र.१ ने कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रीयांचे संरक्षण अधिनियम, २००५ च्या कलम २३ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन सामनेवाला क्र.१ कडुन त्यांना प्रत्येकी दरमहा रु.२५,०००/– अन्नवस्त्र पोटगीसाठी मिळण्याची विनंती केली आहे.

२. अर्जदार क्र.१ चे असे म्हणणे आहे की, सामनेवाले क्र.१ हा तिचा पती असून त्यांचा विवाह दि.११.०६.२०२० रोजी हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे मौजे रांधे, ता.पारनेर, जि.अहमदनगर येथे झालेला आहे व आजपावेतो कोणत्याही सनदशिर मार्गाने संपुष्टात आलेला नाही. तसेच सामनेवाले क्र.२ व ३ हे अर्जदार क्र.१ चे सासु सासरे आहेत. विवाहनंतर सामनेवाले यांनी अर्जदार हीस लग्नानंतर दुस–याच दिवशी कोणतेही कारण नसताना त्रास देण्यास सुरुवात केली व अर्जदार क्र.१ चे अंगावरील सर्व दागिने काढुन घेतले. सामनेवाले हे अर्जदार क्र.१ हीस नेहमी म्हणत की, तुझ्या आईवडिलांनी लग्न थाटामाटा करुन दिले नाही त्यामुळे तुझे लग्नाचा बराच खर्च वाचला आहे त्यामुळे तू तुझ्या आईवडिलांकडुन आणखी सोन्याचे दागिने घेऊन ये. त्या कारणावरुन देखील सामनेवाले हे अर्जदार क्र.१ हीस सतत त्रास देत होते. सामनेवाले हे अर्जदार क्र.१ हिचेकडुन घरातील सर्व कामे करुन घेत असत व तिचा सतत अपमान करुन तिला अश्लील व घाणेरडया शिव्या देत असत. दरम्यानच्या काळात सामनेवाला क्र.१ पासुन अर्जदार क्र.१ ही गरोदर राहिली. अर्जदार क्र.१ चे गरोदरपणात देखील सामनेवाले यांनी अर्जदारास अत्यंत शारिरीक व मानसिक त्रास दिला. परंतु अर्जदार क्र.१ ही तिचे व आईवडिलांचे इज्ञतीपोटी सामनेवाले यांचा सर्व त्रास सहन करत होती. अशातच दि.१२.१२.२०२२ रोजी अर्जदार क्र.१ हीस सामनेवाला क्र.१ पासुन अर्जदार क्र.२ मुलगा नामे कृष्णा झाला. त्यावेळी सामनेवाले हे मुलाला भेटण्याकरिता देखील आले नाहीत व अर्जदार हिला नांदविण्यास नेण्यास देखील आले नाहीत. अर्जदार क्र.१ ने अनेक वेळा फोन करुन तसेच

मध्यस्थ व नातेवाईकांमार्फत सामनेवाले यांना नांदविण्यास नेण्याकामी विनंती केली असता सामनेवाले क्र.१ हा अर्जदारास म्हणाला की, मला तुझी गरज नाही, मी यापुढे तुला नांदविणार नाही, मला घटस्फोट देऊन टाक आणि मला मोकळ कर.

३. अशाप्रकारे सामनेवाला क्र.१ याने अर्जदारांचा स्वतःहुन त्याग केलेला आहे त्यामुळे अर्जदार ही मुलासह मौजे रांधे येथे तिच्या आईवडिलांकडे राहात आहे. अर्जदार तिचे माहेरी राहात असलेपासुन सामनेवाला क्र.१ ने अर्जदारांच्या अन्नवस्त्र निवा–याची औषधोपचाराची काहीएक सोय केलेली नाही. अर्जदार हिचे आईवडिलांची परिस्थिती हालाखीची असून त्यामुळे अर्जदारांची उपासमार होत आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ ने गिरे एस.ए. या विधिज्ञांमार्फत सामनेवाला क्र.१ यास नोटीस पाठविली असता सामनेवाला याने सदर नोटीसीस खोटया व बनावट आशयाचे नोटीस उत्तर पाठविले व अर्जदाराकडे घटस्फोटाची मागणी केली. अर्जदार हीस उत्पन्नाचे काहीएक साधन नाही. याउलट सामनेवाला क्र.१ हा हिंजवडी, पुणे येथे नामांकित आय.टी.कंपनीमध्ये नोकरीस असून त्यास दरमहा रुपये एक लाख इतका पगार मिळतो. तसेच सामनेवाला क्र.१ हा डाटा सायनटीस्ट या विषयाचे शिकवणीचे वर्ग घेत असून त्यापासुन देखील त्यास तीन लाखाचे उत्पन्न मिळते. तसेच सामनेवालांचे एसटोनिया रॉयल सोसायटी, न–हे रोड, पुणे येथे एक आलीशान फलॅट असून त्याचे भाडयातुन देखील त्यांना दरमहा रु.२०,०००/– भाडे मिळते. तसेच सामनेवाले यांचे मालकीचे २ ते ३ फलॅट, २ ते ३ व्यावसायिक गाळा असून त्यापासुन त्यांना दरमहा रुपये दोन लाखाचे भाडे मिळते. तसेच सामनेवाले यांची मौजे भोंगवली, पुणे येथे दोन एकर शेती असून त्यामध्ये ते नगदी पिके घेतात व त्यापासुन देखील त्यांना दरसाल २ ते ३ लाखाचे उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाले यांचे कुटुंबाची दत्तकृपा फुड इंडिस्ट्रीज असून त्यापासुन देखील त्यांना खर्च वजा जाता दरमहा एक लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. सामेवाला क्र.१ याचे व अर्जदारांशिवाय इतर कोणीही अवलंबुन नाही. सबब, अर्जदार क्र.१ हिने सामनेवाले क्र.१ याचेकडुन या अर्जाचा अंतिम निकाल लागेपावेतो त्यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु.२५,०००/– इतकी पोटगीची रक्कम मिळण्याची विनंती केली आहे.

४. सामनेवाले यांनी प्रस्तुत अर्जाचे कामी हजर होवुन निशाणी क्र.१५ वर त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले असून त्यांनी अर्जदारांबरोबरच त्यांचे नाते वगळता इतर संपुर्ण मजकुर नाकारला आहे. सामनेवाले यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१

व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह लॉकडाऊनमध्ये अत्यंत साध्या पध्दतीने व काहीही देणेघेण न करता पारत पडलेला होता व आहे. अर्जदार ही नांदायला आल्यानंतर काही दिवस व्यवस्थीत नांदली व त्यानंतर ती सामनेवाले यांचेसोबत काहीही कारण नसताना भांडणतंटा करु लागली. अर्जदार क्र.१ ही अत्यंत स्वच्छंदी असुन ती तिच्या मनाला वाटेल तसे वागत होती. तसेच अर्जदार क्र.१ ही घरातील कोणताही कामधंदा करत नसे व घरातील सर्वांशी उध्दटपणे बोलत व वागत असे. तसेच ती घर सोडुन निघून जाताना घरातील सर्व दागिने घेऊन सोबत घेऊन गेलेली आहे. तसेच अर्जदार ही सामनेवाले यांना सतत उलट बोलत असे व त्यांचे कोणतेही काम करत नसे. अर्जदाराच्या अशा वागण्यामुळे सामनेवाले क्र.२ व ३ हे त्यांचेपासुन वेगळे मौजे खंडाळा येथे राहण्यास गेले आहेत. सामनेवाले यांनी अर्जदारास वेळोवेळी समजाऊन सांगण्याचा प्रयत्न केला असता ती सामनेवाले यांना आत्महत्या करण्याची धमकी देत असे. अर्जदार क्र.१ ही बाळंतपणासाठी माहेरी गेली असता तिचे बाळंतपणाचा सर्व खर्च सामनेवाले यांनी केलेला आहे. बाळंतपणानंतर अर्जदार ही सामनेवाले यांनी अनेक वेळा प्रयत्न करुन देखील नांदायला आली नाही. सामनेवाले हे अर्जदारास नांदविण्यास आणणेकरिता गेले असता अर्जदार क्र.१ च्या माहेरील लोकांनी सामनेवाले यांना मारण्याचे उद्देशाने त्यांचे अंगावर धाऊन जाउन त्यांना अपमानीत केले व अर्जदार क्र.१ ही सामनेवाले यांना म्हणाला की की, तुमच्या नावावरील व तुमच्या आईवडिलांचे नावावरील सर्व संपत्ती, स्थावर व जंगम मालमत्ता माझ्या व माझ्या मुलाच्या नावाने केल्याशिवाय मी नांदायला येणार नाही. त्यानंतर अर्जदार क्र.१ ने सामनेवाले यांचेविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ नुसार गुन्हा दाखल केला आहे. अर्जदार हिने सामनेवाले यांचे उत्पन्नाबाबत अर्जात केलेली कथने ही पुर्णपणे खोटी व लबाडीची आहेत.

५. उलट अर्जदार क्र.१ ही दि.१६.१२.२०२२ रोजीपासुन स्वतःहुन सामनेवाले यांचा त्याग करुन अर्जदार क्र.२ मुलासह स्वेच्छेने तिच्या माहेरी निघून गेलेली आहे व सामनेवाला क्र.१ यास संसारसुखापासुन वंचित ठेवलेले आहे. सामनेवाला क्र.१ ने पुणे येथे रक्कम रु.८०,००,०००/– ची एक सदनिका विकत घेतली आहे व त्याचा मासिक हप्ता दरमहा रक्कम रु.९०,०००/– इतका भरावा लागत आहे. तसेच सामनेवाले यांचा दैनंदिन खर्च हा जवळपास रु.६०,०००/– इतका आहे. त्यामुळे सामनेवाले यांची आर्थिक परिस्थितील हालाखीची होत चालली आहे. सबब सामनेवाला क्र.१ ची

अर्जदारांना पोटगी देण्याची ऐपत नाही. सबब, सामनेवाले यांनी अर्ज रद्द करण्याची मागणी केली आहे.

६. अर्जदार व सामनेवाले यांचेतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षांनी दाखल केलेले दस्तऐवज व युक्तीवाद यावरुन माझ्या अवलोकनार्थ खालील प्रश्न निर्माण झाले. सदर प्रश्न व त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ हिचा कौटुंबिक हिंसाचार केला अल्याचे अर्जदार प्रथमदर्शनी सिध्द करते का? | अंशतः होकारार्थी |
| २) | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास प्रत्येकी दरमहा रक्कम किती ? | अंशतः होकारार्थी अर्जदार क्र.१ हीस दरमहा रु.५०००/- व अर्जदार क्र.२ यास दरमहा रु.३०००/-. |
| ३) | काय आदेश? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

७. अर्जदार व सामनेवाले यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

८. अर्जदाराच्या कथनानुसार सामनेवाले यांनी तिच्यावर घरगुती हिंसाचार केल्याचे दिसून येते. तसेच सामनेवाले यांनी अर्जदार हिस माहेरी हाकलुन दिल्यानंतर तिच्या कसलीही अन्नवस्त्र पोटगीची व्यवस्था केली नसल्याचे तसेच अर्जदार हिस कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे दिसून येते.

९. महिलांचे कौटूंबीक हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम, २००५ मधील तरतुदींचा विचार करता प्रस्तुत अर्जाच्या निर्गतीसाठी माझेपुढे उपस्थित झालेले मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांचे विवेचन एकत्रितरित्या करणे सोयीचे ठरते. सध्याचा खटला घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायद्यान्वये दाखल आहे. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण तसेच महिलांच्या कल्याणासाठी हा कायदा तयार करण्यामागील विधिमंडळाचा हेतू आहे. महिलांवरील कौटुंबिक हिंसाचार हा घराच्या चार भिंतीत होतो,

हे येथे लक्षात घेण्यासारखे आहे. म्हणून, असे गृहित धरले जाते की ते इतरांनी पाहिले नाही. त्यामुळे, अर्जदाराला शक्यतांच्या आधारे तिची केस सिद्ध करावी लागते, तर दुसरीकडे सामनेवाले यांना पुराव्याच्या आधारे आपले निर्दोषत्व सिद्ध करावे लागते. सामनेवाले यांनी असे सादर केले की अर्जदाराने सामनेवालेंशी गैरवर्तन केले आणि ती सामनेवालेसोबत राहण्यास तयार नाही. तथापि, ही वस्तुस्थिती पुराव्यांद्वारे सिद्ध करणे आवश्यक आहे, म्हणून, या टप्प्यावर ते खरे आहे असे गृहीत धरले जाऊ शकत नाही. अर्जदाराने सामनेवाला क्र.१ वर मारहाण केल्याचा, लैंगिक छळ केल्याचा तसेच हुंडा मागितल्याचा गंभीर आरोप केला आहे, या टप्प्यावर आरोपांच्या मुळाशी जाणे शक्य नाही. प्रथमदर्शनी, अर्जदाराने सामनेवाले यांचेवर केलेले आरोप विश्वासार्ह आहेत की नाही हे पाहणे आवश्यक आहे. तिच्या वादाच्या समर्थनार्थ अर्जदाराने शपथपत्र दाखल केले. म्हणून, अर्ज आणि रेकॉर्डवर दाखल केलेल्या दस्तऐवजाचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी दिसून येते की सामनेवाले यांनी घरगुती हिंसाचाराचे कृत्य केले आहे व त्यामुळे अर्जदार स्वतंत्रपणे मुलासह आईकडे माहेरी रहात आहे.

१०. दोन्ही पक्षांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ प्रथमदर्शनी, असे दिसून येते की अर्जदाराकडे उत्पन्नाचा कोणताही स्रोत नाही आणि ती स्वतःची देखभाल करण्यास असमर्थ आहे. दुसरीकडे, सामनेवाला क्र.१ हा पगारदार व्यक्ती आहे. सामनेवाले याने अर्जात दाखल केलेल्या मिळकत व दायीत्वाचे शपथपत्रामध्ये तो Ognam Technology Services Pvt. Ltd., Hadpsar, Pune येथे इंजिनियर या पदावर कार्यरत असून त्यापासुन त्याला दरमहा रु.१,७०,७६९/- इतके उत्पन्न मिळवित असल्याचे त्याने कथन केलेले आहे. सामनेवाला याचा त्याच्या वडिलोपार्जित शेतीमध्ये तसेच घर मिळकतींमध्ये देखील वाटा आहे. अशा प्रकारे, प्राथमिक, सामनेवाला क्र.१ ची आर्थिक स्थिती चांगली असल्याचे दिसते. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार क्र.१ चा पती असल्याने, आपल्या पत्नीची व मुलाची देखभाल करणे आणि तिच्या मूलभूत गरजा पुरवणे हे सामनेवाला क्र.१ चे कर्तव्य आहे. मुख्य अर्ज निकाली काढण्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे, वरील तथ्ये लक्षात घेता, अर्जदाराला अंतरिम देखभाल मंजूर करणे योग्य होईल. दोन्ही पक्षांच्या कथनांचा विचार केल्यास असे दिसते की सामनेवाला क्र.१ यास रक्कम रु.१,७०,७६९/- इतका पगार मिळत आहे. सामनेवाला यांच्या वतीने अर्जदार यांच्या अंतरिम अर्जास म्हणणे दाखल करण्यात आले

आहे व त्यात अर्जदाराने केलेले आरोप अमान्य केले आहेत. अर्जदार यांच्या कथनानुसार अर्जदार व सामनेवाला यांचे पती–पत्नीचे संबंध आहेत. अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दिनांक ११.०६.२०२० रोजी मौजे रांधे, ता. पारनेर, जि. अहमदनगर येथे प्रचलीत रिती–रिवाजाप्रमाणे संपन्न झाला हे सामनेवाला याने मान्य केले आहे. अर्जदार हिने तिच्या अर्जात सामनेवाला हा तिला क्षुल्लक कारणांवरून भांडण करून शारीरीक व मानसिक त्रास देत होते तसेच जिवे मारण्याची धमकी देत असत. यावरून अर्जदार हिचा सामनेवाले यांचेकडुन कौटूंबिक हिंसाचार होत असल्याचे दिसून येत आहे. अर्जदार हिने दाखल केलेल्या अंतरीम पोटगीच्या अर्जामध्ये केलेल्या कथनांवरून सामनेवाला याने अर्जदार हिच्या पालनपोषणासाठी तसेच उदरनिर्वाहासाठी कोणतीही तजबीज केलेली नसल्याचे स्पष्ट होत आहे.

११. अर्जदार हिने कथन केले की, सामनेवाला क्र.१ हा डाटा सायनटीस्ट या विषयाचे शिकवणीचे वर्ग घेत असून त्यापासुन देखील त्यास तीन लाखाचे उत्पन्न मिळते. तसेच सामनेवालांचे एसटोनिया रॉयल सोसायटी, न–हे रोड, पुणे येथे एक आलीशान फ्लॅट असून त्याचे भाडयातुन देखील त्यांना दरमहा रु.२०,०००/– भाडे मिळते. तसेच सामनेवाले यांचे मालकीचे २ ते ३ फ्लॅट, २ ते ३ व्यावसायिक गाळा असून त्यापासुन त्यांना दरमहा रुपये दोन लाखाचे भाडे मिळते. तसेच सामनेवाले यांची मौजे भोंगवली, पुणे येथे दोन एकर शेती असून त्यामध्ये ते नगदी पिके घेतात व त्यापासुन देखील त्यांना दरसाल २ ते ३ लाखाचे उत्पन्न मिळते. सदर उत्पन्नातून सामनेवाला क्र.१ हा अर्जदार यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रू.२५,०००/– पोटगी सहज देवू शकतो. अर्जदार यांनी कथन केल्याप्रमाणे सामनेवाला क्र.१ याचे उत्पन्न पाहाता मागणी केलेली पोटगीची रक्कम ही अवाजवी वाटत आहे. सामनेवाला क्र.१ याच्यावर अर्जदार व मुलाचा सांभाळ करण्याची नैतिक जबाबदारी आहे. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार व तिचा मुलगा यांच्या उदरनिर्वाहासाठी दरमहा पोटगी रकमेची तजवीज करण्याची जबाबदारी आहे म्हणुन अर्जदार ही सामनेवाला याच्याकडुन तिने मागणी केलेल्या अंतिम पोटगी रकमेपैकी अंशतः अंतरीम पोटगी मिळणेस पात्र ठरत आहे. सामनेवाले याने अर्जात दाखल केलेल्या मिळकत व दायीत्वाचे शपथपत्रामध्ये तो Ognam Technology Services Pvt. Ltd., Hadpsar, Pune येथे इंजिनियर या पदावर कार्यरत असून त्यापासुन त्याला दरमहा रु.१,७०,७६९/– इतके उत्पन्न मिळवित असल्याचे त्याने कथन केलेले आहे.

यावरुन सामनेवाले क्र.१ यास उत्पन्नाचे साधन असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. परंतु सामनेवाला क्र.१ ने त्याचेवर रक्कम रुपये ८० लाखाचे गृहकर्ज असल्याचे देखील नमुद केलेले आहे. अर्जदार क्र.१ व सामनेवाले क्र.१ हे पती पत्नी असून सामनेवाले क्र.१ याची पत्नी या नात्याने अर्जदाराचे पालनपोषण करण्याची नैतिक जबाबदारी आहे. अर्जाचा गुणदोषावर निकाल होण्यास बराच कालावधी लागणार आहे. तोपावेतो अर्जदार हीची उपासमार होवु नये याकरिता अर्जदारास सामनेवाले क्र.१ याचे उत्पन्नाचा विचार करता त्याचेकडुन अर्जदार क्र.१ हीस दरमहा रक्कम रु.५०००/– व अर्जदार क्र.२ यास दरमहा रक्कम रु.३०००/– अशी एकुण दरमहा रक्कम रु.८०,०००/– इतकी अन्नवस्त्र पोटगी देणे न्यायोचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाले क्र.१ ने अर्जदार क्र.१ व २ यांच्या पालनपोषणाकरिता अर्ज दाखल केलेल्या तारखेपासुन म्हणजेच दिनांक ११.०३.२०२४ पासुन अर्जदार क्र.१ हीस दरमहा रक्कम रु.५०००/– व अर्जदार क्र.२ यास दरमहा रक्कम रु.३०००/– अशी एकुण दरमहा रक्कम रु.८,०००/– इतकी अंतरिम अन्नवस्त्र पोटगी म्हणुन मुळ अर्जाचा निकाल होईपावेतो द्यावेत.

३. उभय पक्षकारांना आदेशाची प्रत विनामुल्य देण्यात यावी.

MUBIN CHANDPASHA SHAIKH
Digitally signed by MUBIN CHANDPASHA SHAIKH
Date: 2026.03.10 12:15:45 +0530

दिनांक– ०९.०३.२०२६
पारनेर

( एम. सी. शेख )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, पारनेर.